**डीएनडी आणि यूसीसी संरक्षण**

**अवांछित व्यावसायिक संदेश येणे कसे टाळता येईल?**

येणारे सर्व व्यावसायिक संदेशवहन (कॉल आणि एसएमएस) ग्राहक ब्लॉक करू शकतात किंवा सात विशिष्ट श्रेणींमधील अवांछित व्यावसायिक संदेश निवडकपणे ब्लॉक करू शकतात:

1. बँकिंग / विमा / वित्तीय उत्पादने / क्रेडिट कार्ड्स
2. स्थावर मालमत्ता
3. शिक्षण
4. आरोग्य
5. ग्राहकोपयोगी वस्तू आणि वाहने
6. संपर्क / प्रसारण / मनोरंजन / माहिती तंत्रज्ञान
7. पर्यटन आणि मनोरंजन.
   राष्ट्रीय ग्राहक पसंती नोंदणी' (एनसीपीआर) - ज्याला 'डीएनडी रजिस्ट्री' म्हणूनही ओळखले जाते - यामध्ये आपली पसंती नोंदवून हे करता येते.

**एनसीपीआरमध्ये नोंदणी करण्याची प्रक्रिया काय आहे?**

**डीएनडी नोंदणी:**

अवांछित व्यावसायिक संदेश/कॉलमुळे होणारा त्रास टाळण्यासाठी, ग्राहक टेलिकॉम सेवा पुरवठादाराचे ॲप/वेबसाइट, ट्रायचे डीएनडी ॲप किंवा '1909' वर कॉल/एसएमएस करून सर्व व्यावसायिक संदेश/कॉल ब्लॉक करू शकतात किंवा आपल्या पसंतीच्या श्रेणींनुसार त्यांची निवडकपणे ब्लॉक करण्याची सुविधा वापरू शकतात.

**तक्रार करण्याची प्रक्रिया काय आहे?**

**तक्रारींची नोंदणी:**

1. डिएनडीवर नोंदणी करूनही तुम्हाला स्पॅम (अवांछित संदेश) मिळाल्यास: तुमच्या संबंधित टेलिकॉम सेवा पुरवठादाराचे ॲप/वेबसाइट किंवा ट्राय डिएनडी ॲपद्वारे डीएनडी तक्रार नोंदवा, अथवा '1909' वर कॉल किंवा एसएमएस करा.
2. जर तुम्हाला संशयास्पद फसवणुकीचा संदेश किंवा संपर्क करण्याचा प्रयत्न झाल्यास: गेल्या 30 दिवसांत प्राप्त झालेल्या कोणत्याही संशयास्पद फसवणुकीच्या संदेशाबाबत किंवा संवादाबाबत, दूरसंचार विभागाच्या 'चक्षु' या प्लॅटफॉर्मवर https://sancharsaathi.gov.in/sfc/ येथे अहवाल द्या.
3. जर फसवणूक किंवा सायबर गुन्हा आधीच घडला असेल तर: जर तुमची आर्थिक फसवणुक झालेली असल्यास किंवा तुम्ही सायबर गुन्हयाचे बळी ठरला असाल, तर या घटनेची तक्रार सायबर क्राईम हेल्पलाइन क्रमांक '1930' वर किंवा https://www.cybercrime.gov.in या वेबसाइटवर करा.